Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# दारिद्रय – संकल्पना व वास्तव

डॉ. जयवंत सदाशिवराव भोयर
प्राचार्य व संशोधन मार्गदर्शक, कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

## प्रस्तावना

गरीबी किंवा दारिद्रय हा भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेला एक जुनाट रोग आहे. दारीद्रय हे भारतीयांच्या पाचवीला पूजलेला आहे असे म्हटले जाते ही खरी वस्तुस्थिती आहे. स्वातंत्र्यानंतर भारतात पंचवार्षिक नियोजनातून देशाचा सर्वांगिण आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. 1980 च्या दशकापूर्वी पाच टक्याच्या आसपास असलेला आर्थिक विकासाचा दर नव्वदीच्या दशकानंतर आठ टक्यापर्यंत पोहचला. शेतीउदयोग सेवा क्षेत्र यांचा आर्थिक विकासातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या हिश्यात सकारात्मक पध्दतीने बदल घडून आले. आर्थीक विकासाची प्रक्रिया जेव्हा गतीमान होते तेव्हा सर्वसामान्य लोकांना किमान गरजांची पूर्तता झाली पाहिजे अशी अपेक्षा असते पण प्रत्यक्षात तशी स्थिती दिसत नाही. आर्थिक विकासाचा परिणाम म्हणून दारिद्रय, विषमता



कमी व्हावी, रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होवून बेरोजगारीचा दर कमी व्हावा असे सर्वसाधारणपणे एक गणित असते, पण हे गणित आज बिघडलेले दिसते. आर्थिक विकास झपाटयाने होत आहे असे एका बाजूला भासत असतांना दुस–या बाजूला दारिद्रय आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी ती गडद होण्याची शक्यता आपण नाकारू शकत नाही.

90 व्या शतकानंतर आपण जागतिकीकरणाचा स्वीकार केला. त्यापैकी वित्तीय तुट, प्रतिकूल व्यवहारतोल यामुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होवून भारताची प्रतिमा खालावलेली होती. पण जागतिकीकरणानंतर विदेशी गंगाजळीत वाढ झाली. विदेशी व्यापारातील नियंत्रणे दूर झाल्याने आयात–निर्यातीचे चित्र बदलले. शेती, उदयोग, व्यापार, पायाभूत सुविधांवरील गुंतवणुकीत वाढ झाली पण बाजारात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. गळेकापू स्पर्धेत तग धरून राहणे सर्वसामान्यांना शक्य होत नाही किंवा झाले नाही. बळी तो कानपिळी ही प्रवृत्ती बळावत गेली. नव्या तंत्रज्ञानाच्या वापराने बेकारी वाढली. त्यामुळे जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून अनुकूल परिणामाऐवजी प्रतिकूल परिणामाचे पारडे जड होवू लागले. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात आणि गरीब अधिक गरीब होतात. गरीब आणि श्रीमंतातील उत्पन्न आणि उपभोगाच्या दरीतून दारिद्रयही संकल्पना प्रचलित झाली.

## दारिद्रयाची उदिष्टे (Objectives) :–

1) दारिद्रयाच्या विविध संकल्पना अभ्यासणे
2) दारिद्रयाचे स्वरूप अभ्यासणे.
3) दारिद्रयाच्या कारणाचा अभ्यास करणे.
4) दारिद्रय निमूर्लनाचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती :–

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम सामुग्रीवर आधारलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, भारताचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल व तज्ज्ञांचे शोध निबंध इत्यादी मधून माहितीचे संकलन करून प्रस्तूत लेख तयार करण्यात आला.

## दारिद्रयाची संकल्पना :–

दारिद्रयाच्या संकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

### 1) सापेक्ष दारिद्रय (Relative Poverty) :–

सापेक्ष दारिद्रय ही संकल्पना उत्पन्नातील विषमतेवर आधारीत आहे. म्हणजे ही संकल्पना दोन गटातील उत्पन्न विषमता स्पष्ट करण्यास मदत करते. एक गट हा विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा जास्त असलेला तर दुसरा गट हा विशिष्ट उत्पन्न पातळीपेक्षा कमी उत्पन्न असलेला असतो. साहजिकच कमी उत्पन्नातील गट हा सापेक्षात दारिद्रयात जीवन जगत असतो. कारण या गटातील व्यक्ति यांना मिळणा–या उत्पन्नातून त्यांच्या सामान्य गरजांची पूर्तता करू शकत नाही.

### 2) निरपेक्ष दारिद्रय (Absolute Poverty) :–

ज्यावेळेस व्यक्तिची किमान जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी क्षमता नसते तेव्हा त्या निरपेक्ष दारिद्रय असे म्हणतात. थोडक्यात व्यक्तिला प्राप्त होणा–या उत्पन्नातील त्याच्या किमान अत्यावश्यक, जीवनावश्यक गरजा भागत नसतील तर त्याला निरपेक्ष दारिद्रय असे म्हणतात.

### दारिद्रय म्हणजे काय.?

दारिद्रयाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

### 1) गिलिन :–

‘दारिद्रय ही अशी अवस्था आहे ती ज्यात व्यक्ति अपु–या उत्पन्नामुळे असो या अयोग्य खर्चामुळे असो. ज्या समाजात ती व्यक्ती राहते तेथील राहणीमानाचा दर्जा गाठू शकत नाही की, जो त्याची शारीरिक व मानसिक कार्यक्षमता वाढवेल.’

### 2) गोगार्ड :–

‘दारिद्रय म्हणजे स्वतःवर अवलंबून असणा–या व्यक्तीचे पालन पोषण करण्यासाठी तसेच निरोगी, उत्साही राहण्यासाठी लागणा–या जरूरीच्या वस्तूचा अपूरा पुरवठा होय.’

### 3) नियोजन मंडळ :–

नियोजन मंडळानी दारिद्रयाचे मोजमाप करतांना 1977.78 च्या किंमतीनुसार मासिक दरडोई उत्पन्नाची मर्यादा ग्रामीण व शहरी भागासाठी अनुक्रमे 65 रू आणि 75 रू निश्चित केले. 1977–78 मध्ये 48 टक्के लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगत होते.

### 4) प्रा.अमर्त्य सेन :–

‘एखादया व्यक्तिला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय.’

### 5) वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट :– (200–2001)

दारिद्रय म्हणजे योग्य पध्दतीने अन्न व निवारा यांचा अभाव, ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तिस सुयोग्य राहणीमान, घरे, आरोग्य सुविधा व पिण्याच्या पाण्याच्या सुविधा मिळत नाहीत.

### दारिद्रयाची कारणे :–

भारतीय अर्थतज्ञांनी दारिद्रयाचे विश्लेषण केलेले आहे. दारिद्रय हे दृष्टचक्र असते. प्रा.नर्क्स यांच्या मते दारिद्रयाची कारणे आणि परिणाम दारिद्रयातच असतात. दारिद्रय ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. भारतात दारिद्री कोण आणि दारिद्रय किती. यापेक्षा दारिद्रय का हा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. भारतीय

समाज ग्रामीण व शहरी या दोन गटात विभागलेला आहेत. त्यामुळे दारिद्रयाचे वर्गीकरण ही ग्रामीण दारिद्रय व शहरी दारिद्रय असे केलेले आहे.

### ग्रामीण व भाहरी दारिद्रय

| अ.क. | वर्श | ग्रामीण | भाहरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 1973–74 | 56.4 | 49.0 | 54.9 |
| 2 | 1977–78 | 53.1 | 45.2 | 51.3 |
| 3 | 1983–84 | 45.7 | 40.2 | 44.5 |
| 4 | 1987–88 | 39.1 | 38.2 | 38.9 |
| 5 | 1993–94 | 37.3 | 32.4 | 36.0 |
| 6 | 2000–01 | 27.1 | 23.6 | 26.1 |
| 7 | 2004–05 | 29.2 | 26.0 | 28.3 |
| 8 | 2010–11 | 20.6 | 20.0 | 21.1 |

**Source :-** Economic Survey 2011-12, Economic Division Ministry of Finance, Govt. of India.

### ग्रामीण दारिद्रय :–

ग्रामीण दारिद्रय हे भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा भाग आहे. ग्रामीण भागातील भांडवल, उत्पन्न साधने जमिनीचे असमान वाटप, शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व, लहरी मोसमी पाउस, जलसिंचनाच्या अपु–या सुविधा आणि उपलब्ध सिंचनाचे पुन्हा विषम वाटप, कोरडवाहू शेतीचे मोठे प्रमाण, वेगाने वाढणारी श्रमशक्ती, व रोजगार संधी या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम म्हणून भारतातील ग्रामीण दारिद्रयाची व्याप्ती व तीव्रता अधिक आहे.

### नागरी दारिद्रय :–

शहरात वास्तव्य करणा–या ज्या व्यक्तिंना त्यांच्या रोजच्या आहारामधून दररोज 2100 पेक्षा कमी उष्मांक प्राप्त होतात, त्यांना शहरी दारिद्रय असे म्हणतात. उदयोगधंदयांचे आधुनिकीकरण व नवे तंत्रज्ञान, भांडवल प्रधान अर्थव्यवस्थेची प्रकिया यामुळे रोजगार संधी घटत गेल्या आहेत. कंत्राटी कामगारांच्या वाढ वाढत्या प्रमाणामुळे त्यांना कामगार कल्याण व सामाजिक सुरक्षिततेचे लाभ मिळत नाहीत.

### राज्यनिहाय गरीबीचे प्रमाण :–

दारिद्रयाचे प्रमाण राज्यनिहाय वेगवेगळे आहे. आणि त्यामुळे तेंडुलकर समितीचे जुने निकष व नवे निकष खालील तक्त्यात दिलेले आहेत.

**तक्ता कमांक**

| | *2004–05 मधील प्रमाण (जुन्या निकशानुसार)* | *2004–05 मधील प्रमाण (तेंडूलकर निकशानुसार)* | *2009–10 मधील प्रमाण (तेंडूलकर निकशानुसार)* |
|---|---|---|---|
| बिहार | 41.4 | 54.4 | 53.5 |
| छत्तीसगड | 40.9 | 49.4 | 48.7 |
| मणिपुर | 17.3 | 37.9 | 47.1 |
| झारखंड | 40.3 | 45.3 | 39.1 |
| महाराष्ट्र | 30.7 | 38.2 | 24.5 |
| गोवा | 13.8 | 24.9 | 8.7 |

| | | | |
|---|---|---|---|
| पुदुच्चेरी | 22.4 | 14.2 | 1.3 |

दारिद्रयाचे प्रमाण विचारात घेतल्यास 2004–05 मध्ये (जुन्या निकषानुसार) महाराष्ट्रात 30.7 टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती. 2004–05 मध्ये तेंडुलकर निकषानुसार महाराष्ट्रात 38.2 टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती. 2009–10 मध्ये तेंडूलकर निकषानुसार महाराष्ट्रात 24.5 टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली होती.

वरील तक्त्यानुसार असे दिसून येते की, सर्वात जास्त दारिद्रय असणारा देश बिहार असून 2004–05 मध्ये (जुन्या निकषानुसार) 41.4 टक्के दारिद्रय होते. तसेच तेंडूलकर निकषानुसार 54.5 टक्के दिसून आले. व 2009–10 मध्ये 53.5 टक्के झाले. सर्वात कमी दारिद्रय पुदुच्चेरी मध्ये 2009–10 मधील प्रमाण 1.3 टक्के असून तेंडूलकर निकषानुसार 2004–05 मध्ये ते प्रमाण 14.2 टक्के दिसून आले.

## भारतातील दारिद्रयाची कारणे

### 1) मंद आर्थिक विकास :–

गेल्या दोन दशकामध्ये देशाच्या विकासाचा वार्षिक दर 5 टक्के पेक्षा अधिक आहे. तरी 1951 ते 1990 पर्यंत हा दर केवळ सरासरी 3.5 टक्के इतकाच होता. वाढती लोकसंख्या ही विकासातील अडसर बनल्याने देशात अजूनही औदयोगिक क्रांती झालेली नाही कमी दरडोई उत्पन्न व कमी दरडोई उपभोग खर्च यामुळे दारिद्रय टिकून आहे.

### 2) वाढती बेकारी :–

मंद औदयोगिकरण व वाढती लोकसंख्या तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगती यामुळे रोजगार मागणी पेक्षा रोजगार संधी कमी असल्याने दारिद्रय वाढत आहे.

### 3) शिक्षण आणि कौशल्याचा अभाव :–

देशात आज शिक्षण प्रसार वाढत असला तरी ग्रामीण निरक्षरता अधिक आहे. व्यावसायिक शिक्षणाचा अभाव, प्रशिक्षण व कौशल्याचा अभाव यामुळे दारिद्रयाचा राक्षस अर्थव्यवस्थेत आढळतो.

### 4) भांडवल व संयोजन कौशल्याचा अभाव :–

देशात भांडवलाचा अभाव व संयोजन कौशल्याचा अभाव यामुळे देशात दारिद्रय निर्माण झाले आहे.

### 5) भाववाढ :–

नियोजन काळात सातत्याने केलेला तुटीचा अर्थभरणा वाढती लोकसंख्या यामुळे सतत भाववाढ झालेली आहे. भाववाढीमुळे आर्थिक शोषण होउन गरीबांची गरीबी अधिक वाढते.

### 6) नैसर्गिक आपत्ती :–

अवर्षण, अतिवृध्दी, महापूर, भुकंप, दुष्काळ, प्रतिकूल हवामान अनिश्चीत मान्सून यामुळे लोकांच्या उत्पन्नात सातत्य राहिले नाही पण दारिद्रयात मात्र सातत्य राहिले आहे.

### 7) सामाजिक घटक :–

एकत्र कुटुंब पध्दती व कुटुंबाचा मोठा आकार यामुळे भारतीय कामगारात भौगोलीक गतिशीलता कमी आहे. तसेच व्यसनाचे प्रमाण, अंधश्रध्दा अनिष्ठ प्रथा यामुळे धार्मिक कार्य, लग्न, मुंज यावर कर्ज काढून अधिक खर्च केला जातो. परिणामतः यामूळे कर्जबाजारीपणा व दारिद्रय आढळते.

### 8) शेती विकासाला कमी महत्व :–

नव्या धोरणाने शेती व्यावसायाला कमी महत्व दिले गेल्याने दारिद्रय वाढण्याला मदत झाली. नव्या व्यवस्थेने औदयोगिक क्षेत्राला आणि परदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्यांना विशेष महत्व दिले की ज्यातून ग्रामीण रोजगार निर्मितीची शक्यता नव्हती. दारिद्रयाचा प्रश्न शेतीव्यवसायाच्या व कृषी आधारीत उद्योगाच्या विकासाशी निगडीत आहे. कृषी आधारीत उद्योग महत्वाचे आहेत. पण या गोष्टीकडे दुर्लक्ष झाले.

## दारिद्रय निर्मुलन :–

दारिद्रय म्हणजे गरिबी ती दूर करण्यासाठी एकत्रित येउन केलेले कार्याचे वर्णन केले आहे. गरिबी दूर झालेस दारिद्रय कमी होते. दारिद्रय निर्मूलनामध्ये दारिद्रयाच्या संकल्पनेतील पाच घटक उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणे होय.

### 1) पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान व भांडवलवृध्दी :–

उत्पादन क्षमतेत वाढ होण्यासाठी शेती, शेतीपूरक व्यवसाय, उदयोगधंदे व रोजगार निर्मिती होणे आवश्यक आहे. मानवी साधनसंपत्ती आरोग्यसंपन्न होणे हे राष्ट्राचे दृष्टीने भांडवल निर्मिती, वृध्दी होय. मानवी साधनसंपत्ती शिक्षित होणे. शिक्षणाच्या सुविधा समाजात निर्माण होणे. तंत्रशिक्षणाचा उपयोग उदयोग धंदयांमध्ये कुशल मजूरांचा पुरवठा होण्यासाठी होतो. साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्याकरिता केलेल्या उपाययोजना बालकांचे रक्षण करतात. मुलांना शाळेत उपस्थित राहणे शक्य होते. शाळेच्या इमारतीमुळे शैक्षणिक सुविधा मिळतात. रोजगार उपलब्धतेमुळे कर्जाची परतफेड शक्य होते.

### 2) नोकरी व उत्पादन :–

शिक्षणाच्या सुविधेमुळे मजूर वर्गाची निर्मिती होते. तांत्रिक ज्ञानामुळे कुशल तंत्रज्ञ मिळणे शक्य होते. त्यामुळे उत्पादन वाढते. आर्थिक वृध्दीकरिता ही मानवी श्रमशक्ती उपयुक्त ठरते. व्हिएतनामध्ये कमी वेतनावर अधिक कर्मचारी नेमले व स्थिर उत्पादन उत्पादकांना घेता आले त्यामुळे अधिक लोकांना रोजगार प्राप्त झाला. व उत्पादकांच्या नफयात कोणताही बदल झाला नाही ही नवीन मार्केटिंग पॉलिसी व सामाजिक जडणघडणीत हातभार लावण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला.

### 3) शेतक–यांना मदत :–

छोटया शेतक–यांना मदतीचा हात दिल्याने शेती उत्पादनात वृध्दी होते. उत्पादकता वाढल्याने देशातील निम्या लोकसंख्येला त्याचा लाभ होतो व शेतीपुरक उदयोगांना चालना मिळते. शेती उत्पादनावर आधारीत उदयोगांना गती लाभते. फुल उत्पादन हा नव्याने वाढीस लागणारा उदयोग व फुल आणि फळांवर प्रक्रिया उदयोगांना अन्न सुरक्षा व पब्लीक वेलफेअर जन सुरक्षा करतांनाच आर्थिक वृध्दी साधता येते.

### 4) सबसिडी व अनुदान :–

शासन नवनव्या उदयोगाच्या उभारणीकरिता सबसिडी देणे, जमीन उपलब्ध करून देते, मुक्त व्यापार धोरणात मोठया उदयोगसमुहांना आवश्यक सुविधा पुरविते. त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील व्यक्तिंना प्रोत्साहन अनुदान दिले गेल्यास त्यांना छोटे छोटे उदयोग सुरू करणे शक्य आहे.

### 5) स्त्रियांचे सबलीकरण :–

बचत गटांच्या माध्यमातून स्त्रियांना उदयोग व्यवसायकरिता प्रेरित केले जात आहे. त्यातून देशातील जनता क्रियाशिल होउन दारिद्रय निर्मूलन होण्यास मदत होत आहे. गरीब महिलांचे सामाजिक, राजकिय व आर्थिक सक्षमीकरणासाठी आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या सहाय्याने राज्यात जुलै 2007 पासून तेजस्विनी महाराष्ट्र राज्य ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविला जात आहे.

## समारोप :–

ग्रामीण भागात दारिद्रयाचे प्रमाण आणि तीव्रता तुलनेने अधिक आहे. त्यासाठी त्या भागातील कमकुवत गटातील व्यक्तींना कर्ज पुरवठा करून विकासाची संधी दिली पाहिजे. देशातील ग्रामीण बॅकाच्या कार्यपध्दतीतील दोष आणि वाटचालीतील उणिवा दूर करून विकास योजनांची आखणी व अंमलबजावणी स्थानिक परिस्थिती नूसार व्हावी अल्प भांडवलावर चालविता येणारे लघुउदयोग इत्यादींना चालना देउन उत्पन्न निर्मितीची साधने वाढविता येतात. त्याचबरोबर व्यवसायासाठी कच्चा माल, उत्पादिन वस्तुंसाठी विक्री व्यवस्था इत्यादी सेवादेखील तेथे गरजेच्या ठरतील. अशा दोन्ही बाजूंनी प्रयत्न केल्यास संभाव्य लाभार्थींचा सक्रिय सहभाग वाढेल व दारिद्रय कमी होण्यास मदत होईल. दारिद्रय हा मानवी जीवनास मिळालेला शाप आहे. व्यक्तिला आपल्या किमान मुलभूत गरजा पूर्ण न करता येण्याची अवस्था म्हणजे दारिद्रय होय. भारतात आजवर अनेक प्रयत्न करूनही दारिद्रयाचे समुळ उच्चाटन झालेले नाही. दारिद्रयाची समस्या दूर करण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज आहे. सरकार, समाजसेवी संस्था आणि स्वतः यांनी तसे प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे दारिद्रयाचे उच्चाटन होईल.

## संदर्भ सूची :–

1) Bhargava B.K. / Vandana Sethi, ‘Indian Economy’, Sultan Chand & Sons, New Delhi, PP 183.
2) Dondekar V.M. / Nilkantha, ‘Poverty in India (1971) Syed Ishaque at Sangam Press Ltd. 17B Kothrud, Pune, PP-29
3) Economic Survey 2012-13
4) चव्हाण एन.एल, ‘भारतीय अर्थव्यवस्था,’ प्रशांत पब्लीकेशन, जळगाव 2015, पृ.क. 99
5) शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन कोल्हापूर, शिवार्थ–2013 पृ. क.112
6) पी.आर.कुलकर्णी – ‘भारतीय अर्थव्यवस्था’
7) अनंत फडके – भारतात दारिद्रय का आहे?
8 ) अर्थसंवाद, जुलै – सप्टेंबर 2012, खंड 36